Date : 22 Jan 2025

## Government Medical College, Dharashiv (Osmanabad)

# A WORKSHOP ON STRUCTURED PUBMED SEARCHING AND REFERENCING

**Conducted by**

**QMed Knowledge Foundation, Mumbai**

**In Collaboration with MUHS**

**To register [Free Registration]**
**Please scan the QR Code below**

https://tinyurl.com/qmed-gmc-reg

**Date - 22nd January, 2025**
**Time - 9.30AM to 4.30PM**
**Venue - College Council Hall,**
**GMC Dharashiv**

**(Supported by an educational grant from Pfizer)**

Date : 22 Jan 2025

शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, धाराशिव येथे २२ जानेवारी २०२५ रोजी लिटरेचर सर्च कार्यशाळा आयोजित करण्यात आली. ही कार्यशाळा QMed फाऊंडेशन आणि GMC धाराशिव यांच्या संयुक्त विद्यमाने महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक कार्यक्रमांतर्गत आयोजित करण्यात आली. सन्माननीय अधिष्ठाता डॉ. शिल्पा डोमकुंडवार मॅडम यांच्या सातत्यपुर्ण प्रयत्नांमुळे आणि दृढतेमुळे फायझर फाऊंडेशनकडून प्रायोजकत्व (Sponsership) मिळवून ही कार्यशाळा शक्य झाली.

या कार्यशाळेच्या प्रमुख संसाधन व्यक्ती म्हणून QMed फाऊंडेशनच्या CEO श्रीमती वसुमती श्रीगणेश उपस्थित होत्या, त्यांना २०२४ मध्ये us अकादमी, बेंगलुरू कडून जीवन गौरव पुरस्कार मिळाला आहे. त्या खरोखरच प्रेरणादायी व्यक्तिमत्व आहेत. अशा कार्यशाळा त्या राष्ट्रीय महत्त्वाच्या संस्थांमध्ये, जसे की AIIMS, येथेआयोजित करतात.

लिटरेचर सर्च कार्यशाळेचा मुख्य उद्देश सर्वांना संशोधनात सहभागी होणे सुलभ करणे व संशोधनाचे शिक्षण देणे हा होता.

कार्यशाळा टप्प्याटप्प्याने विभागली गेली होती, लिटरेचर सर्च चे सर्व पैलू समाविष्ट करता येतील. ही एक प्रत्यक्ष (लाइव्ह) आणि परस्पर संवादात्मक सत्र होते. प्रत्येक टप्प्याचे प्रात्यक्षिक करून दाखवण्यात आले आणि सर्व सहभागींकडून प्रत्यक्ष करून घेतले गेले, ज्यामुळे चांगले शिक्षण सुनिश्चित झाले.

कार्यशाळेमध्ये लिटरेचर सर्च प्रात्यक्षिक झाल्यानंतर झोटेरो (Zotero) नावाच्या सहाय्यक साधनाचा वापर करून संदर्भ व्यवस्थापन करण्याबाबत शिकवले गेले.

सत्राची सांगता उत्तर चाचणी (Post test) घेऊन करण्यात आली, ज्याद्वारे सहभागींनी सत्रातून किती शिकले ते तपासले गेले.

कार्यशाळा पूर्ण झाल्यानंतर सहभागींच्या गुणांमध्ये मोठ्या प्रमाणात सुधारणा दिसून आली. अंडरग्रॅज्युएट विद्यार्थ्यांपासून ते DNB निवासी, पदव्युत्तर निवासी आणि प्राध्यापक स्तराच्या शिक्षकांपर्यंत सर्वांनी या कार्यशाळेतून भरपूर नवीन कौशल्ये आणि ज्ञान प्राप्त केले.

Date : 22 Jan 2025





Date : 22 Jan 2025






Date : 22 Jan 2025




